पे.का.मु.-४०,००० पु. (२५ x ६)-९८-२०१०-ए ३-बि (बाद) ३५६

FORM - 1A

N.C.R.B.

I.I.F.-106

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. पहिली खबर क्र. FIR No. ९८/२०१८ वर्ष Year २०१८ दिनांक Date २५/०८/१८

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.अधिनियम,1988 कलमे Sections 7,8,13(1)(d) सह 13(2)
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार ........ तारीख पासून ११/०८/१८ वेळ १४ पासून तारीख पर्यंत २८/०८/१८ वेळ १८.०० वा.
   Occurence of offence : Day Date from Time Date to Time

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)

3. (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेची Information received at P. S. तारीख Date २८/०८/१८ वेळ Time १५.०० वा.

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०२/१८ तारीख Date २५/०८/१८ वेळ Time ०९.५० वा.

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा दक्षिणेस १ कि.मी. चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ठिकाणाचे नं. गल्ली रस्त्याचे नाव
   Address of Occurence Name No./Ward Name of road
   म्हाडा, मुंबई बिल्डींग रिपेअर्स व रिकन्स्ट्रक्शन बोर्ड, कार्यालयाच्या प्रवेशद्वारील मोकळी जागा, रजनी महल,
   जवळचे ओळख चिन्हं/ठिकाण Nearest Adentifiable Place म्हाडा ऑफिस, ताडदेव, मुंबई-400034. गाव Village पोस्ट Post तालुका Taluka जिल्हा Dist. राज्य State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
   In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address
   (a) नाव Name प्रभाकर कर्णिक (b) वडिलाचे / पतीचे नाव Father's / Husbands Name मारुती कर्णिक
   (c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age 52 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9004511399
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation कंत्राटदार
   (g) धर्म Religion हिंदू जात Caste जनजात Sub-Caste
   (h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. Address : Ward घर/नाव नंबर House/Name No. फोन/मो. नंबर Phone/M. No. पॅन नं. Pan No. ओटर्स नं. Card No.
   रूम नं. [illegible] [illegible] सोसायटी
   रस्त्याचे नाव Road जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place गाव Village पोस्ट Post पो.स्टे. P. Stn.
   [illegible] वरळी, मुंबई-400030.
   तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).
   १) महेश अर्जुनदास मोरवानी, 51 वर्षे, धंदा-नोकरी (शाखा अभियंता/मुंबई बिल्डींग रिपेअर्स व रिकन्स्ट्रक्शन बोर्ड, रजनी महल, ताडदेव, मुंबई) रा.फ्लॅ.नं.ए/1302 [illegible] सेंटर, सिद्धार्थनगर, कोपरी, ठाणे (पूर्व), ठाणे.

फिर्याद      दि.24/04/2018

फिर्यादी श्री. प्रभाकर मारुती कर्णीक, 52 वर्षे
धंदा: कंत्राटदार, रा.डी. रूम नं.300, विं.नं.19,
किमिला को.ऑ.हौ. सोसायटी, आदर्श नगर,
वरळी, मुंबई-400030 यांचा सविस्तर जबाब
संगणकावर मराठीत टंकलिखित केला. सदर
जबाबाची स्वतंत्र कागदावर प्रिंट आऊट
घेवून त्यावर फिर्यादीची स्वाक्षरी घेण्यात
आली. सदरहू जबाब ही फिर्यादीची प्रथम
खबरी अहवाल समजण्यात यावी.

समक्ष

[signature]

(चंद्रसेन पालकर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

[signature]
24/4/18

8 तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... तात्काळ
Records for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.
रु.15,000/-

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ... रु.15,000/-
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties) रु.15,000/-

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.
यातील नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील आलोसे महेश मोरवाली 51 वर्षे, शाखा अभियंता/ म्हाडा ऑफीस, लाउडेन, मुंबई यांनी स्वतःच्या पदाचा गैरवापर करुन शासकीय परिश्रमा खेरीज परितोषण म्हणून फिर्यादी यांनी केलेल्या कामाचे देयके मंजूर करण्याकामी पडताळणी दरम्यान फिर्यादीकडून रु.35,000/-इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केली. तसेच तडजोडीअंती रु.15,000/- लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यानुसार सापळा कारवाई दरम्यान आलोसे मोरवाली यांचे सांगण्यावरुन खाजगी इसम नितीन दळवी याला फिर्यादीकडून रु.15,000/- लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही — 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ......

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ......

3. दुस-या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...... जिल्हा ...... राज्य ......

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) ...... Rank ...... No. ...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ...... (3) Transferred to P. S. ...... District ...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name चंद्रसेन पालकर
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र.
Posting ला.प्र.वि. मुंबई
Coding No. of I. O. ......

15. १. न्यायालयात सादर केल्याची तारीख ......
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

(के) -Form 1-A

—फिर्याद— दिनांक— २४/०४/२०१८

श्री. प्रभाकर मारुती कर्णिक, वय—५२ वर्षे, धंदा—सिव्हील कॉन्ट्रॅक्टर, रा.ठि. रुम नं.३००, बिल्डींग क्र.१९, निर्मला को. ऑ. हौ. सोसायटी, आदर्श नगर, वरळी, मुंबई—४०००३०. मो.क्र.९००४५११३९९.

....

मी वरील प्रमाणे असून नमुद पत्यावर माझे कुटूंबीयांसोबत २० वर्षापासून राहतो. माझे सह माझी पत्नी नामे श्रीमती कल्पना प्रभाकर कर्णिक वय ५२ वर्षे व दोन मुली असुन त्यांची नावे कु. मानसी प्रभाकर कर्णिक, २१ वर्षे व मानवी प्रभाकर कर्णिक, १७ वर्षे असे एकत्र राहतात.

मी सन २००० पासून म्हाडाचे सिव्हील कॉन्ट्रक्टर म्हणुन काम करतो. मी माझा मित्र नामे श्री. देवकर यांच्या मे.मयुरेश मजदुर सहकार संस्था मर्यादीत या कंपनीचे वतीने सब कॉन्ट्रक्टर म्हणुन म्हाडाची कामे करतो. त्याबदल्यात मे. मयुरेश मजदुर सहकार संस्थेचे श्री. देवकर यांना शासनाकडून जे बिल मंजूर होते. त्यातून माझे मित्र देवकर हे त्यांना मिळालेल्या देयक रकमेतून ५ टक्के रक्कम स्वत:चे कमिशन कापून उर्वरीत रक्कम माझे कामाचा मोबादला म्हणून देतात. सदर व्यवसायातुन माझा व माझे कुटुबियाचा उदरनिर्वाह चालतो.

मे. मयुरेश मजदुर सहकार संस्था मर्यादीत या संस्थेला संकल्प सिध्दी म्हाडा इमारत, मुंबई सेंट्रल या इमारतीचे मलवाहिनीचे व शहाबाद लादीचे (ड्रेनेज व टाईल्स) काम करण्यासाठी दिले. म्हाडाचे सिव्हील कॉन्ट्रक्टर म्हणुन मी काम करीत असल्याने मला दिनांक २४/०७/२०१७ रोजी सब कॉट्रॅक्टर म्हणून मे. मयुरेश मजदुर सहकार संस्था मर्यादीत या संस्थेकडून काम मिळाले. सदर मलवाहिनीचे काम हे म्हाडा, डी—२ मधील अधिकारी शाखा अभियंता श्री.मोटवाणी यांचे अधिपत्याखाली चालु होते. नमुद कामासंदर्भात शासनाकडून पहिल्या टप्प्यात रु.३ लाखाची मंजूर मिळाली. त्यानंतर सदर मलवाहिने काम करत असतांना मलवाहिनी बांधकामाचा खर्च आणखी रु.२ लाख इतका वाढला असल्याबाबत मी म्हाडाचे अधिकारी श्री. मोटवाणी यांना माहिती दिली. त्या अनुषंगाने श्री. मोटवाणी यांनी मला सांगितले की, वाढलेल्या खर्चाबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर केला असुन शासनाने एकूण रु.५लाखाचा खर्च मंजूर केला आहे. त्यानंतर मी दिनांक २०/०९/२०१७ रोजी सदर मलवाहिनीचे बांधकाम रोजी पुर्ण केले. बांधकाम पुर्ण झाल्याने संकल्प सिध्दी म्हाडा इमारतीच्या मलवाहिनीच्या कामाची तपासणी माझे सोबत श्री.मोटवाणी यांनी केली व काम योग्य असल्याचे सांगितले. श्री.मोटवाणी यांचे सांगण्यावरुन संकल्प सिध्दी म्हाडा इमारतीचे मलवाहिनी बांधकामाचे संपूर्ण मोजमाप केले. त्यानंतर दिनांक २४/०४/२०१८ रोजी बांधकामाच्या खर्चाचे बील तयार करुन शाखा अभियंता श्री.मोटवाणी यांना दिले. त्या बिलापैकी श्री.मोटवाणी यांनी रु.२,८२,१८५/—बिलाची मंजुरी दिली. उर्वरीत बिल रु.१,९७,९७१/—दुसऱ्या टप्प्यात लवकरात लवकर मंजूर करतो म्हणून मला श्री.मोटवाणी यांनी आश्वासन दिले. उर्वरीत बिलाबाबत मी वारंवार श्री.मोटवाणी यांना विचारणा केली असता ते टाळाटाळ करीत असे.

त्यानंतर दिनांक ११/०४/२०१८ रोजी शाखा अभियंता श्री.मोटवाणी यांचे कार्यालयात जावुन उर्वरीत देयके (बिले) मंजुर करण्याकामी श्री.मोटवाणी यांनी रु. ३५,०००/— ची लाचेची मागणी केली होती.

मला वर नमुद लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने मी म्हाडा डी—२ विभाग, रजनी महल,ए.सी.मार्केट समोर,ताडदेव,मुंबई येथे नेमणुकीस असलेले शाखा अभियंता श्री.मोटवाणी यांचेविरूध्द दि.२४/०४/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, वरळी, मुंबई येथे जावून तेथील वरिष्ठांना भेटलो. त्यांनी मला पोलीस निरीक्षक पालकर व पोलीस निरीक्षक मयेकर यांची भेट घालून दिली व मला तक्रार अर्ज लेखी देण्यास सांगितले असता, मी श्री.मोटवाणी यांचेविरूध्द इंग्रजीमध्ये लेखी तक्रार अर्ज दिला.

त्यानंतर पो.नि.पालकर यांनी मला दिलेल्या सुचनेनंतर लोकसेवक श्री. मोटवाणी यांचे कार्यालयात जावून उर्वरीत बिला मंजूर करण्याबाबत चर्चा करून लोकसेवकाची प्रत्यक्ष भेट घेणार आहे असे सांगितले. त्यावेळी मला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात येणार असल्याचे सांगितले. मला व लोकसेवक यांच्यात होणारे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रित करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी माझेकडे लाचेची मागणी करीत असल्याचे निष्पन्न झाल्यास त्या अनुषंगाने पुढील सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

पो.नि.पालकर, पो.नि.मयेकर, पंच व मी असे लाचलुचपत प्रतिबंधक मुंबई विभागाचे गोपनीय कक्षात गेलो. त्याठिकाणी पो.नि.पालकर यांचे सुचनेवरुन एक पोलीस कर्मचारी यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर हजर केला. पो.नि.पालकर यांनी सदरहु कर्मचारी हे. पो.शि.क्र.०३—२११/मठपती असल्याचे ओळख करून दिली. सदर कारवाईमध्ये पो.शि. मठपती हे भाग घेणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि.पालकर यांनी प्रथम डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर पंचासमक्ष फॉरमॅट करून तो चालू करुन त्यामध्ये कोणतेही पूर्व संभाषण नसल्याची खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये प्रथम माझे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले.

दिनांक २४/०४/२०१८ रोजी ठरल्यानुसार गोपनियतेच्या कारणास्तव पो.नि. पालकर व पो.नि.मयेकर व पथक असे लाप्रवि. कार्यालयातून पोलीस वाहनाने लोकसेवक यांचे यांचे पडताळणी जाण्यासाठी रवाना झाले. मी, पंच व पोलीस पथक फिल्म सिटी समोर, ए.सी.मार्केट जवळ आलो. सदर ठिकाणी पोलीस वाहन थांबवून पो.नि. पालकर यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला व्हाईस रेकॉर्डर लावून तो चालू करुन लोकसेवकाची भेट घेण्याकामी पाठविण्यात आले.

त्याप्रमाणे दिनांक २४/०४/२०१८ रोजी पडताळणी दरम्यान १७.३२ वा चे सुमारास मी व पंच असे लोकसेवक श्री.मोटवाणी यांना भेटण्यासाठी त्यांचे कार्यालय म्हाडा डी—२ विभाग,रजनी महल,ए.सी.मार्केट समोर,ताडदेव,येथील पहिला माळा येथे

गेलो असता, श्री. मोटवाणी यांना मी माझे उर्वरीत बिलाचे कागदपत्रे दाखवून बिल मंजूरीबाबत विचारणा केली असता ते हिंदीतून बोलले की, " पहले किया हुआ कामका पैसा, और अभिके बिल मंजुर करनेका पैसा, सब मिलाके रु.३५,०००/— अभी देना" असे सांगितले. त्यावेळी माझेकडे एवढे पैसे नसल्याचे सांगून माझे मित्राकडून घेवून आणून देतो असे सांगितले असता त्यांनी तडजोडी अंती रू. १५,०००/—ची लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

मी माझे बरोबर आलेल्या पंचासह पोलीस वाहन थांबलेल्या ठिकाणी येवून वरील प्रमाणे हकीकत पो.नि. पालकर यांना सांगितली. त्यानुसार पो.नि.पालकर यांनी पडताळणी दरम्यान आमच्यात झालेले संभाषण ऐकून श्री.मोटवाणी यांनी लाचेची मागणी केल्याची खात्री केली. त्यावेळी मी माझेकडील रु.१५,०००/— (रु.२००० च्या ०३ चलनी नोटा व रु.५०० च्या १८ भारतीय चलनी नोटा) पो.नि.पालकर यांचेकडे दिल्या. पोनि.पालकर यांनी पोलीस वाहनावरील पोलीस शिपाई चालक क्र. १४.०३२३/अल्बाड यांचेमार्फत रु.१५,०००/—रकमेस पंचासमक्ष ॲंथ्रेसिनची पावडर कापसाच्या बोळयाने लावली. सदरहु नोटा पोलीस चालक अल्बाड यांनी पंचासमक्ष त्यांचे हाताने माझे शर्टाचे डाव्या खिशात ठेवल्या. तसेच पोलीस निरीक्षक पालकर साहेब यांनी मला सापळा कार्यवाही संदर्भात सुचना दिल्या. त्याचप्रमाणे श्री.मोटवाणी अथवा त्याच्या वतीने कोणी इसमाने लाचेची रक्कम स्विकारल्यास मी लावलेला चष्मा काढून चेहऱ्यावरुन हात फिरवून सापळा पथकास इशारा देण्याबाबत सूचना केली. सदर सुचना दिल्यानंतर पो.नि. पालकर यांनी मला व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री.चिलवंत यांचे समवेत श्री.मोटवाणी यांना भेटण्यासाठी ठरल्याप्रमाणे लोकसेवक यांचे कार्यालय म्हाडा डी—२ विभाग, पहिला मजला, रजनी महल येथे पाठविले.

मी लोकसेवक यांचे कार्यालयात आलो असता लोकसेवक श्री.मोटवाणी व माझी उर्वरीत बिलाबाबत पुन्हा चर्चा झाली असता सापळा कारवाई दरम्यान माझे शर्टाचे डाव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम रु.१५,०००/—ठरल्यानुसार उजव्या हाताने काढुन श्री.मोटवाणी यांना देण्याकरीता पुढे केली. त्यावेळी मोटवानी याने स्वत: मागणी केलेली लाचेची रक्कम रु.१५,०००/ न स्विकारता त्यांचे कार्यालयात असलेला खाजगी इसम दळवी यांचेकडे देण्यास सांगितले. म्हणून मी, श्री.दळवी यांचेकडे जात असताना ते कार्यालयाचे समोरील मोकळया पॅसेजमध्ये भेटले. सदरवेळी मी, श्री दळवी यास श्री.मोटवाणी यांचे सांगण्यावरून लाचेची रक्कम रु.१५,०००/— देवू केली असता श्री.दळवी यांनी सदर लाचेची रक्कम श्री. मोटवानी यांचेकरीता स्विकारली. त्यावेळी मला दिलेल्या सुचनेप्रमाणे इशारा केला असता खाजगी इसम श्री.दळवी यास लाचेची रक्कम स्वीकारताना सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी रंगेहाथ पकडले. तसेच सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी श्री. मोटवाणी व खाजगी इसम दळवी असे दोघांनाही ताब्यात घेतले.

तरी आज दिनांक २४/०४/२०१८ रोजी केलेल्या पडताळणीत लोकसेवक श्री.मोटवाणी यांनी केलेल्या कामाचे देयके मंजुर करण्यासाठी कार्यकारी अभियंता,

म्हाडा (मुंबई बिल्डींग रिपेअर्स व रिकस्ट्रक्शन बोर्ड, रजनी महल,ताडदेव मुंबई येथील शाखा अभियंता लोकसेवक मोटवानी यांनी रू.३५,०००/—ची लाचेची मागणी केली. तडजोडीअंती रू.१५,०००/— लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक मोटवानी याचे सांगण्यावरुन खाजगी इसम दळवी यांनी माझेकडून रू.१५,०००/—लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडले. म्हणून माझी श्री.मोटवाणी व खाजगी इसम दळवी याचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला अंसून तो मी वाचून पाहिला असता माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

( चंद्रसेन पालकर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई